भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/११/२०१७

१) अज्ञात इसमाने एटीएम मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंदः– .

दिनांक १३/११/२०१७ चे १३.५० ते दिंनाक १४/११/२०१७ चे दरम्यान यातील फिर्यादी सुरेश लाळकन पटले वय ४५वर्ष रा. सालेभाटा हा एसबीआय एटीएम लाखनी येथे त्याचे एसबीआय शाखा लाखनीचे खात्यामधुन पैसे काढण्यास गेला असता अज्ञात आरोपी इसमाने मि पैसे काढुन देतो म्हणुन चालाकीने फिर्यादीचे एटीएम कार्ड त्याचे ताब्यात घेवुन दुसरेच एटीएम कार्ड हातात देवुन फिर्यादीचे एटीएम कार्ड त्यातील अज्ञात आरोपीने सोबत नेवुन फिर्यादीचे खात्यातुन साकोली व रायपुर येथील एटीएम मधुन ८३,०००/रु काढुन फसवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(सी) माहीती तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

२) दारूच्या नशेत वाहन चालवीतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंदः– .

दिनांक १७/११/२०१७ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीने त्यांचे पोलीस स्टॉप सह ड्रंकन ड्राईव्ह केसेस करण्या कामी पो.स्टे. परीसरात पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी हा दारू पिवुन दारूच्या नशेत मोटार सायकल चालवींताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे वैदयकीय परीक्षण केले असता दारूचे अमलाखाली असल्याचा अभिप्राय वरून सरतर्फे फिर्यादी पो.ना. शेंडे यांचे रिपोर्ट पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. शेंन्डे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

३) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १७/११/२०१७ चे २०.१७ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक खापा चौक येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. चिचखेडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. चिचखेडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

४) **आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १७/११/२०१७ चे १६.४५ ते १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स वाहन ही गोबरवाही दवाखाना चौक येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोउपनी. जाईले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाईले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

५) **विहीरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु.:–**

दिनांक १७/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक नंदु भगवान टिकमगडे वय ५२ वर्ष, रा. राजेदहेगाव हा त्याचे शेतातील विहीरीमध्ये कुदुन विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी दिलीप मारोती वैदय वय ४८ वर्ष रा. राजेदहेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

५) **गळफास लावुन युवकाचा मृत्यु.:–**

दिनांक १७/११/२०१७ चे १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक आकाश मोरेश्वर ढोरे वय १८ वर्ष, रा. वोपारा याने घराचे बासाच्या काठीला नॉयलान दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी रमेश गनाजी ढोरे वय ४० वर्ष रा वोपारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा उईके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक १७/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी १० तीन सिटर वाहनांवरती २२ केसेस व ईतर वाहनांवरती ११६ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक** कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.